जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
15 JUL 2018
पुण्यनगरी

# पेठवडगाव येथे विजयवंत महोत्सवाचे उद्‌घाटन

## शाहू शिक्षण प्रसारक मंडळाचा उपक्रम

**पेठवडगाव / प्रतिनिधी :** विद्यार्थ्यांचा बहुआयामी विकास व्हावा. स्पर्धात्मक युगात गतिशील व क्रियाशील विकास व्हावा यासाठी शाहू शिक्षण संस्थेने विजयवंत महोत्सवाचे आयोजन केले आहे. कौशल्य, तंत्रज्ञान, संशोधन, व्यवस्थापन यांचा वापर करून संस्थेने अनेक विद्यार्थी घडवले आहेत, असे गौरवोद्‌गार शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी काढले. ते येथील शाहू शिक्षण प्रसारक मंडळाच्या सुवर्णमहोत्सवी विजयवंत महोत्सवाच्या उद्‌घाटनप्रसंगी बोलत होते. अध्यक्षस्थानी उच्च शिक्षण विभागाचे शिक्षण सहसंचालक डॉ. अजय साळी होते. यावेळी माजी पोलीस आयुक्त व संस्था अध्यक्ष गुलाबराव पोळ, उपाध्यक्षा विजयादेवी यादव, सचिव विद्याताई पोळ, शिवाजी विद्यापीठाचे शैक्षणिक सल्लागार डॉ. डी. आर. मोरे प्रमुख उपस्थित होते.

डॉ. शिंदे म्हणाले, विद्यार्थ्यांनो, आई-वडिलांना विसरू नका, कष्टाला लाजू नका, अंधश्रद्धेला बळी पडू नका, स्वतःवर विश्वास ठेवा व चांगले मित्र जोडा, या पंचसूत्रीचा अवलंब करून जीवनात यशस्वी नागरिक बना. तसेच नकारात्मक विचारावर मात करून सकारात्मक दृष्टिकोन ठेवावा. अध्यक्षस्थानावरून बोलताना डॉ. अजय साळी म्हणाले, संस्कारांचे प्रतिबिंब शाहू शिक्षण संस्थेने जोपासले आहे. या माध्यमातून बळवंत, विजयवंत, विद्यावंत या त्रिसूत्रीमुळे वडगाव परिसरात शैक्षणिक घोडदौड सुरू आहे. पालकांनी विद्यार्थ्यांमधील क्षमता ओळखणे गरजेचे आहे. यावेळी माजी पोलीस आयुक्त गुलाबराव पोळ म्हणाले, ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना विविध स्पर्धेत सहभागी होता यावे. तसेच त्यांच्या कौशल्यपूर्ण गुणवत्तेस चालना मिळावी, या उद्देशाने विजयवंत महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. संस्थेतून गुणवंत, संस्कारक्षम, शिस्तप्रिय नागरिक घडावेत यासाठी विशेष लक्ष देत आहे.



**पेठवडगाव येथील श्री शाहू शिक्षण प्रसारक मंडळाच्या विजयवंत महोत्सवाच्या उद्‌घाटनप्रसंगी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, माजी पोलीस आयुक्त गुलाबराव पोळ, उच्च शिक्षण सहसंचालक डॉ. अजय साळी, सचिव विद्याताई पोळ, डॉ. सरदार जाधव, प्राचार्य प्रदीप पाटील, प्राचार्या डॉ. विजया चव्हाण आदी.**

यावेळी सुवर्णमहोत्सवी वर्षानिमित्त लोगो तसेच शिक्षकांनी व विद्यार्थ्यांनी तयार केलल्या गीताचे अनावरण मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. प्रारंभी ग्रंथदिंडी काढण्यात आली. तसेच परिसरातील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार यावेळी करण्यात आला. स्वागत व प्रास्ताविक डॉ. विजया चव्हाण यांनी, तर आभार प्राचार्या स्नेहल नार्वेकर यांनी मानले. सूत्रसंचालन प्रशांत भोरे यांनी केले.

यावेळी डॉ. सरदार जाधव, प्राचार्य प्रदीप पाटील, मुख्याध्यापिका शोभा देसावळे, दयावती चव्हाण, श्रुती महाजन, डॉ. सचिन पवार, अभिजित गायकवाड, नगरसेविका अनिता चव्हाण, संगीता मिरजकर, नगरसेवक जवाहर सलगर, माजी उपनगराध्यक्ष सुनील हुकेरी, जयभवानी पतसंस्थेचे चेअरमन राजन शेटे, माजी नगरसेवक आनंदा म्हेत्रस आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
15 JUL 2018
महाराष्ट्र टाईम्स

# शाहू संस्थेचे कार्य कौतुकास्पद

म. टा. वृत्तसेवा, हातकणंगले

**कुलगुरू डॉ. शिंदे यांचे प्रतिपादन; विजयवंत महोत्सवाचे उद्घाटन**



'सध्याच्या काळात विद्यार्थांचा बहुआयामी विकास व्हावा त्याचबरोबर स्पर्धात्मक युगात गतिशील व क्रियाशील विकास होण्यासाठी शाहू शिक्षण संस्थेने विजयवंत महोत्सवाचे आयोजन केले आहे. कौशल्य, तंत्रज्ञान, संशोधन व व्यवस्थापन यांचा वापर करून अनेक विद्यार्थांना घडविण्याचे कौतुकास्पद काम केले आहे,' असे गौरवोद्गार शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. डॉ. देवानंद शिंदे यांनी केले. पेठवडगाव (ता. हातकणंगले) येथील शाहू शिक्षण प्रसारक मंडळाच्या सुवर्णमहोत्सवी विजयवंत महोत्सवाच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी उच्च शिक्षण विभागाचे शिक्षण सहसंचालक डॉ. अजय साळी होते.

कुलगुरू डॉ. शिंदे म्हणाले, 'विद्यार्थांनी आई-वडिलांना विसरू नये, कष्टाला लाजू नये, अंध्दश्रद्धेला बळी पडू नये, स्वतःवर विश्वास ठेवावा व चांगले मित्र जोडावे या पंचसूत्रीचा अवलंब करून जीवनात यशस्वी नागरिक बनण्याचा प्रयत्न करावा तसेच नकारात्मक विचारांवर मात करून सकारात्मक दृष्टिकोन बाळगा. जीवनात नक्की यशस्वी होण्यास मदत होईल.'

संस्थेचे अध्यक्ष गुलाबराव पोळ म्हणाले, 'ग्रामीण भागातील विद्यार्थांना विविध स्पर्धेत सहभागी होता यावे तसेच त्यांच्या कौशल्यपूर्ण गुणवत्तेस चालना मिळावी या उद्देशाने विजयवंत महोत्सवाचे आयोजन केले आहे. संस्थेतून गुणवंत, संस्कारक्षम, शिस्तप्रिय नागरिक घडावेत यासाठी विशेष लक्ष देत आहे.'

यावेळी डॉ. अजय साळी यांचेही भाषण झाले. सुवर्णमहोत्सवी वर्षानिमित्त लोगो व तसेच शिक्षक व विद्यार्थांनी तयार केलेल्या गीताचे अनावरण मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले..

यावेळी यावेळी संस्थेचे अध्यक्ष गुलाबराव पोळ, उपाध्यक्षा श्रीमती विजयादेवी यादव, सचिव विद्याताई पोळ, विद्यापीठाचे शैक्षणिक सल्लागार डॉ. डी. आर. मोरे, संचालक सरदार जाधव, प्राचार्य प्रदीप पाटील, मुख्याध्यापिका शोभा देसावळे, आदींसह उपस्थित होते.